International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.935
Vol.6 No.2 Nov – Dec 2018

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: शासकीय मदतीचे प्रयत्न

**डॉ. बाळासाहेब बी. पवार**

*राज्यशास्त्र विभाग,*

*न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर*

**प्रस्तावना:**

जागतिकीकरणाच्या धोरणाला अनुसरून भारतात १४३५ शेती वस्तूंवरील संख्यात्मक नियंत्रणे रद्द केली. त्यामुळे या मालाची आयात वाढली. याचा परिणाम शेती उत्पादनावर झाला. भारतात आयात होणाऱ्या कृषी मालांवर प्रवळ व्यापारी लांबीमुळे ५०४ ते ७०% एवढाच आयात कर लावला जातो. गॅट करारानुसार हा कर १०० ते ३००% पर्यंत लावला जाऊ शकतो. यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर साखर, दूध, फळे खाद्यतेल यांची आयात होऊन स्थानिक बाजारातील या वस्तूंच्या किमती कमी झाल्या, भारतात कृषी मालांच्या निर्यातीच्या दृष्टीने कधीच जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले नाहीत. त्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सवलती दिल्या जात नाहीत. त्यामुळे भारतातील निर्यातीचे प्रमाण अत्यल्प आहे. ऑस्ट्रेलिया व इस्वायलमध्ये ७५% शेती उत्पादने निर्यात होतात. अमेरिकेत हेच प्रमाण ३३% आहे. या धोरणाचा परिणाम भारतात ११% होऊन भारतीय शेती व्यवसाय उद्ध्वस्त झाला आहे.

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या:**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यात जास्त प्रमाणात होत आहेत. प्रामुख्याने कोरडवाहू कापूस उत्पादक पट्ट्यात हे प्रमाण जास्त आहे. परंतु आता सधन अशा पश्चिम महाराष्ट्रातसुद्धा शेतकरी आत्महत्या करू लागले आहेत तर कोकणातसुद्धा काही आत्महत्यांचे प्रकार घडले आहेत.

**तक्ता: महाराष्ट्रातील वर्षनिहाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या**

| अ. क्र. | वर्ष | शेतकऱ्यांच्या आत्महत्या (NCRB) |
|---|---|---|
| १ | १९९७ | १९१७ |
| २ | १९९८ | २४०९ |
| ३ | १९९९ | २४२३ |
| ४ | २००० | ३०२२ |
| ५ | २००१ | ३५३६ |
| ६ | २००२ | ३६९५ |
| ७ | २००३ | ३८३६ |
| ८ | २००४ | ४१४७ |
| ९ | २००५ | ३९२६ |
| १० | २००६ | ४४५३ |
| ११ | २००७ | ४२३८ |
| १२ | २००८ | ३८०२ |
| १३ | २००९ | २८७२ |
| १४ | २०१० | ३१४१ |

या प्रमाणात १९९७ ते २००७ या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. या सर्वच शेतकऱ्यांना मात्र शासनाची मदत मिळालेली नाही. यातील पात्र ठरलेल्या शेतकरी कुटुंबीयांना एक लाख रुपये मदत देण्यात आली.

1. ३०,०००/- रु. रोख
2. ७०,०००/- मुदतीच्या ठेवीत गुंतवणूक

**आत्महत्या मदतीस पात्र ठरण्याचे निकषः**

1) आत्महत्या केलेली व्यक्ती शेतकरी असली पाहिजे.
2) ज्यावेळी अपघात घडला त्यावेळी आत्महत्या झालेल्या व्यक्तीवर कर्ज असायला पाहिजे.
3) कर्जबाजारीपणा हे आत्महत्येस कारण असायला पाहिजेत
4) या निकषानुसार पात्र शेतकऱ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे

**तक्ता: शासकीय अनुदानास पात्र-अपात्र आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब**

| अ. क्र. | वर्ष | एकूण शेतकऱ्यांच्या आत्महत्या | अनुदानास अपात्र शेतकरी | अनुदानास अपात्र शेतकरी |
|---|---|---|---|---|
| १ | १९९७ | -- | -- | -- |
| २ | १९९८ | -- | -- | -- |
| ३ | १९९९ | -- | -- | -- |
| ४ | २००० | -- | -- | -- |
| ५ | २००१ | ५९ | २९ | ३० |
| ६ | २००२ | १२२ | ७९ | ४३ |
| ७ | २००३ | १७५ | १०२ | ७३ |
| ८ | २००४ | ६३२ | ३४० | २९२ |
| ९ | २००५ | ५९५ | ३६४ | ३३१ |
| १० | २००६ | २३९५ | १०२८ | १३६७ |
| ११ | २००७ | १९६५ | ५९० | १३७५ |

**स्त्रोत**: विभागीय आयुक्त कार्यालय अहवाल, २००७ विभागीय कार्यालम, औरंगाबाद

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भात शासनाचे पॅकेजः**

महाराष्ट्रातील प्रामुख्याने विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी १ जुलै २००७ रोजी नागपूर येथे ३७५० कोटी रुपयांचे. पंकज जाहीर केले. तर डिसेंबर २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने अगोदरच १०७५ कोटी रुपयांचे स्वतंत्र पॅकेज जाहीर केले होते. हे पंकज फक्त विदर्भातील सहा जिल्ह्यांना मिळाले. विदर्भखालोखाल आत्महत्या झालेल्या मराठवाड्याला व त्यानंतर उर्वरित भागाला या पॅकेजचा फायदा मिळाला नाही.

वरिल दोन्ही पॅकेजचे परिणाम स्वरूप विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणे अपेक्षित होते. परंतु विदर्भातील सहाही जिल्ह्यांत या आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे.

**महाराष्ट्र शासनाचे पॅकेजः**

मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांनी हिवाळी अधिवेशन डिसेंबर २००५ रोजी १०७५ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले.

१) कापूस उत्पादकांना प्रतिहेक्टरी १००० रु. मदत म्हणून देण्यात आले.

२) पाणलोट क्षेत्राला भरीव मदत.

३) सामूहिक विवाह सोहळ्यासाठी मदत.

४) पीक विमा योजनेच्या हप्त्यांत सवलत.

५) कृषी उद्योगाला चालना देण्यासाठी आर्थिक मदत.

६) शेतकऱ्याच्या शेती व कौटुंबिक खचर्चासाठी क्रेडिट कार्ड योजना.

७) सावकारी कर्जाचे नियमन करण्यावर भर.

८) शेतकऱ्यांना २५००० रुपयांपर्यंत पीक कर्जाची पुनर्रचना.

या उद्देशाने विदर्भातील आत्महत्याग्रस्त यवतमाळ, अमरावती, अकोला, वर्धा, वाशीम, बुलढाणा या जिल्ह्यांत हा पायलट प्रकल्प म्हणून राबवण्यात आला. एकंदर विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न लक्षात घेता त्या दृष्टीने राज्य सरकारने पॅकेजद्वारे केलेला उपचार उपयोगी ठरला नाही. ती वरवरची मलमपट्टी उरली. शेतकऱ्यांना शेतीला पाणी, माफक दरात कर्ज व शेतीमालाला योग्य किंमत मिळणे आवश्यक होते. या दीर्घकालीन उपायांचा उल्लेख या पॅकेजमध्ये केला गेला नाही.

**केंद्राचे पॅकेज:**

प्रसार माध्यमांनी लक्ष वेधल्यानंतर व विविध सेवाभावी संस्था, संघटना व राजकीय पक्षांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर लक्ष वेधल्यानंतर नागपूर दौऱ्यात पंतप्रधानांनी १ जुलै २००७ रोजी विदर्भातील सहा जिल्हे यवतमाळ, अकोला, अमरावती, वाशीम, बुलढाण्यासाठी ३७५० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल.

**तक्ता: केंद्राच्या विदर्भ पॅकेजमधील आर्थिक तरतुदी**

| अ. क्र. | **तरतुद** | **कोटीत** |
|---|---|---|
| १ | व्याजमाफी | ७१२ कोटी |
| २ | जलसिंचन योजना | २१७७ कोटी |
| ३ | सूक्ष्म सिंचन | ७८ कोटी |
| ४ | चेक डॅम | २४ कोटी |
| ५ | विस्तार सेवा कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) | ३ कोटी |
| ६ | बियांणाचे वाटप | १८० कोटी |
| ७ | राष्ट्रीय फलोत्पादन मिशन कार्यक्रम | २२५ कोटी |
| ८ | शेतीपुरक व्यवसाय | १३५ कोटी |
| एकूण | | ३७५० कोटी |

**स्त्रोत**: जिल्हाधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अमरावती.

विदर्भातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहता त्यांना तातडीच्या उपायाची गरज होती. परंतु पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये जलसिंचनावर सर्वाधिक भर देण्यात आला. आर्थिक तरतूद ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत दीर्घकालीन उपाय योजना होती. त्यामुळे

1) दोन हेक्टरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना एकरकमी कर्जफेडीवर २५% सूट मिळेल. त्यांनी त्या कर्जाचे हप्ते ३० जून २००९ पर्यंत फेड केले तरी चालेल. शिल्लक कर्जावर कोणतेही व्याज लागणार नाही.
2) दुष्काळग्रस्त २३७ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना चकीत कर्जाच्या २५% अथवा २० हजार यापैकी जास्त असलेली रक्कम माफ केली जाईल.
3) शेतीबरोबरच कुक्कुटपालन व इतर जोडधंद्यांना कर्ज माफी.

अशा प्रकारे केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून शेत जमिनीवरील (सातबारा) बोजा कमी करण्याचे आदेश महसूल विभागाल दिले. महाराष्ट्र शासन व केंद्राचे पंकज व कर्जमाफी योजना या प्रभावी ठरल्या नाहीत. त्यानंतरही शेतक-यांच्या आत्महत्या गांवल्या नाहीत, स्वातंत्र्यापासून शेती क्षेत्रात नियोजन व निश्चित धोरण नसल्यामुळे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव, जलसिंचनाची प्रभावी योजना, माफक दरात कर्जपुरवठा व विमा संरक्षण या बाचीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

त्याचा पंकजमध्ये अंतर्भाव नव्हता. कर्जमाफीने हा प्रश्न सुटणार नाही. कारण कर्जमाफीचा सर्वाधिक फायदा ज्या विभागात शेतकऱ्यांच्या कर्जामुळे आत्महत्या झाल्या नाहीत त्या भागात झाला.

1. पश्चिम महाराष्ट्र 54%
2. मराठवाडा 24%
3. विदर्भ 20%
4. कोकण 02%

पश्चिम महाराष्ट्रात सहकारी बँका सक्षम आहेत जलसिंचनाच्या सोयी आहेत. शेतकरी बागायतदार वर्गात मोडतो व उसाचे नगदी पीक घेतले जाते त्याला मोठ्या प्रमाणात बँका पीक कर्ज देतात. त्यामुळे कर्ज माफीचा फायदा पश्चिम महाराष्ट्राला जास्त झाला आहे.

**सारांश:**

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याबाबत केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी वेळोवेळी आर्थिक मदतीचे पॅकेज दिले परंतु ते पैसे कीव ती मदत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्या बरोबर त्या भागातील शेतकऱ्या पर्यन्त

पोहचली असे अनेक अहवाल सांगतात परंतु जो पैसा ज्या कारणासाठी दिला होता तो त्याच कारणासाठी वापरला गेला का हे पाहणारी यंत्रणा नसल्या मुळे या मदतीचा काहीही उपयोग झाला नाही. शेतकरी आत्महत्या अद्याप ही सुरूच आहेत. कारण ही मदत म्हणजे वर वर ची मलम पट्टी होती. या प्रश्नावर इतक्या वर्षात कायम उपाय केला गेला नाही.

**संदर्भ:**


१) शिवा वंदना- WTO Robbed Indian Farmer, www.vandnashiva.com.

२) शिवा वंदना- Seeds of Suicide A Paper on www.vandnashiva.com.

३) बालकृष्णन्न समिती अहवाल (२०००) १८ मार्च २०००,

४) खेर सी.प. (२००८) जागतिकीकरण समस्या आशय व अनुभव, दिलीपराज प्रकाशन पुणे, पृ.२४.

५) गायकवाड मुकुंद प्रकाशन, पुणे २.३. जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, कॉन्टिनेन्टल

६) विभागीय आयुक्त वार्षिक अहवाल, (२००७), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, पृ.क्र.३३.

७) देशपांडे सुधाकर (२००६), विशेष कृती पॅकेजनंतर विदर्भासाठी कृषी विकास पॅकेज हवे, दै. हिंदुस्थान नागपूर, ०४/०७/२००६.

८) जहागीरदार दि.व्यं. 'निमित्य पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पॅकेजचे, दै. हिंदुस्थान, आर्थिक जगत, अमरावती, ०३/०७/२००६.

९) जिल्हाधिकारी (२००८), जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

१०) जाधव नरेंद्र, विदर्भातील शेतकरी आत्महत्या व पॅकेज अंमलबजावणीसंबंधी एक सदस्यीय आयोग अहवाल, २७ जुलै, २००८.